महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
तिसरा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्रमांक : ०२२- २२८२६८११
Email :- adm1.fd@maharashtra.gov.in

क्रमांक : विविआ-२०२६/प्र.क्र.६४/प्रशासन- १
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२६

प्रति,
संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

**विषय :** सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता जाहीरात देण्याबाबत.

महोदय,

वित्त विभाग (खुद्द) मंत्रालय, मुंबई येथे १ सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची १ वर्षाकरिता नियुक्ती करावयाची असून त्याकरिता प्रसिध्द करावयाच्या जाहीरातीचा मसुदा सोबत जोडला आहे.

तरी सदर जाहिरात दिनांक २८.१०.२०२६ रोजीच्या मुंबईतील मराठी (अधिक खपाच्या) एका वर्तमानपत्रात नियमानुसार प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(शुभांगी शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत सहपत्रासह आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. कक्ष अधिकारी, संगणक कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेला जाहिरातीचा मसुदा दिनांक २८.१०.२०२६ रोजी वित्त विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.
२. निवडनस्ती (प्रशासन-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

**Details on Website**

# वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

**सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता :**

राज्यातील कर्जांची आकडेवारी अद्ययावत करणे/ताळमेळ घेणे/कर्जाच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूद करणे/कर्जरोख्याद्वारे उभरावयाच्या निधीसंदर्भातील तसेच शासन हमी संदर्भातील प्रस्ताव तपासणे/कर्जांच्या लेख्याशी संबंधित कामे इ. विषयक कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असलेल्या एक सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची प्रथमत: किमान १ वर्षासाठी वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे :-

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

२) राज्यातील कर्जांची आकडेवारी अद्ययावत करणे/ताळमेळ घेणे/कर्जाच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूद करणे/कर्जरोख्याद्वारे उभरावयाच्या निधीसंदर्भातील तसेच शासन हमी संदर्भातील प्रस्ताव तपासणे/कर्जाच्या लेख्याशी संबंधित कामे इ. कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.

३) उमेदवार मंत्रालयीन सेवेतून लेखा अधिकारी या पदावरुन निवृत्त झालेला असावा.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

६) उमेदवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नसावी.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या मंत्रालीयन सेवेतून निवृत्त झालेल्या इच्छुक सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने त्यांचा विहित नमुन्यातील अर्ज वेबसाईट वरील जाहीरात पाहून adm1.fd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर दिनांक ०४.११.२०२६ पर्यंत सादर करावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८२६८११ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) आवश्यकता भासल्यास उमेदवारांची निवड करण्यासाठी मुलाखत घेतली जाईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांना वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) करार पध्दतीच्या नियुक्तीवरील कालावधीत सेवानिवृत्त लेखा अधिकारी हे संबंधित सह सचिव/ उप सचिव यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

--x--

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्तीकरण्याकरिता अर्ज

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-.............................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.............................................................................

३) सेवानिवृत्तीचा दिनांक : .............................................................................

४) सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन व वेतनस्तर. :- .............................................................................

५) ज्या विभागातून सेवानिवृत्त झाला त्या विभागाचे नाव :-.............................................................................

६) भ्रमणध्वनी क्रमांक :-.............................................................................

७) जन्म दिनांक व वय :-.............................................................................

८) विभागीय चौकशी प्रलंबित आहे किंवा कसे :-.............................................................................

९) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

१०) कामकाजाचा अनुभव :-.............................................................................

वित्त विभागाच्या संकेतस्थळावर दि. रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहिरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराची स्वाक्षरी**